सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य**

**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१**

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०७/२०२५, मुंबई, दि. ई-स्वाक्षरीत नमूद

**संदर्भ** :- महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र.सीसीटव्ही-३६१५/प्र.क्र.१३०/ भाग-२/ई-७५६०२३/पोल-३, दि.१९ मे,२०२५

**विषय** :- राज्यातील पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी निधी वितरीत करण्याबाबत.

******

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र.सीसीटव्ही-३६१५/प्र.क्र.१३०/भाग-२/ ई-७५६०२३ / पोल-३, दि.१९ मे,२०२५ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२५०५१९९१६०१०७१८२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Signed by
Pravin Madhukar Shikhare
Date: 20-05-2025 17:48:56

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह).
कार्यासन अधिकारी, का.क्र.२१

प्रत,

अपर पोलीस महासंचालक (का.व सु.),महाराष्ट्र राज्य ,मुंबई (सस्नेह).
विशेष पोलीस महानिरीक्षक (का.व सु.) महाराष्ट्र राज्य ,मुंबई(सस्नेह).
सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु,) महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत,

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके " वित्त व लेखा " या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

राज्यातील पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी निधी वितरीत करण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन
## गृह विभाग
### शासन निर्णय क्रमांकः सीसीटी-३६१५/प्र.क्र.१३०/भाग-२/E-७५६०२३/पोल-३

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १९.५.२०२५.

<u>वाचा</u> :-

१. मा उच्च न्यायालय, मुंबई यांचे क्रिमिनल रिट पिटीशन क्र.२११०/२०१४ वरील दि.१३.०८.२०१४, दि.२१.१०.२०१५, दि.२४.०२.२०१६, दि.२१.०९.२०१६ व दि.३०.११.२०१६ रोजीचे आदेश.

२. मा. सर्वोच्च न्यायालयाचे क्रिमीनल रिट पिटीशन क्र.५३९/१९८६ वरील दि.२४.७.२०१५ रोजीचा न्यायनिर्णय.

३. सचिव, माहिती तंत्रज्ञान संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र.संकीर्ण-२०१२/प्र.क्र.३७/१८,दि.०४.०३.२०१३.

४. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं / २१ / ७२७२ / न्या.प्र. सीसीटीव्ही / २०३ / २०१४, दि.२७.०१.२०१५.

५. शासन निर्णय, गृह विभाग क्र. सीसीटी-३६१५/प्र.क्र.१३०/पोल-३, दि.२३.११.२०१५.

६. शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. भांखस-२०१४ / प्र.क्र.८२ / भाग III / उद्योग - ४, दि.३०.१०.२०१५ व दि.०१.१२.२०१६.

७. शासन निर्णय, सामान्य प्रशासन (माहिती व तंत्रज्ञान) विभाग क्र. मातंसं - १७१६ - ३६१५ / प्र.क्र.२८६ / ३९, दिनांक ०९.०८.२०१६.

८. शासन निर्णय, गृह विभाग क्र.सीसीटी-३६१५/प्र.क्र.१३०/भाग-१/पोल-३,दि.०६.०१.२०१७.

९. शासन निर्णय, गृह विभाग क्र.सीसीटी-३६१५/प्र.क्र.१३०/पोल-३, दिनांक २६.०३.२०१८.

१०. शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.संकीर्ण-२०१८/प्र.क्र.१४४/२०१८/कोषा.प्रशा-५,दि.२८.०९.२०१८.

११. महा-आयटी कॉर्पोरेशनचे पत्र क्र.MahaIT/PRJ/०३९/०१/२०१८, दि.२४.०७.२०१९.

१२. शासन निर्णय, गृह विभाग क्र.सीसीटी-३६१५/प्र.क्र.१३०/पोल-३, दिनांक १४.११.२०१९.

१३. शासन निर्णय, गृह विभाग क्र.सीसीटी-३६१५/प्र.क्र.१३०/पोल-३, दिनांक ११.१२.२०१९.

१४. शासननिर्णय,गृहविभागक्र.सीसीटी-३६१५/प्र.क्र.१३०/भाग-३/पोल-३,दि.१७.०१.२०२२.

१५. शासन निर्णय, गृह विभाग क्र. सीसीटी-३६१५/प्र.क्र.१३०/भाग-४/पोल-३, दि.१२.१२.२०२२.

१६. शासन निर्णय, गृह विभाग क्र. सीसीटी-३६१५/प्र.क्र.१३०/भाग-४/पोल-३, दि.२१.०३.२०२३.

१७. शासन निर्णय, गृह विभाग क्र. सीसीटी-३६१५/प्र.क्र.१३०/भाग-५/पोल-३, दि.५.७.२०२३

१८. शासन निर्णय, गृह विभाग क्र. सीसीटी-३६१५/प्र.क्र.१३०/भाग-२/पोल-३, दि.११.१०.२०२३

१९. शासन निर्णय, गृह विभाग क्र. सीसीटी-३६१५/प्र.क्र.१३०/भाग-२/E-७५६०२३/पोल-३, दि.३१.३.२०२४, (दोन स्वतंत्र शासन निर्णय) व दि.३१.३.२०२५.

२०. मे.सुजाता कम्प्युटर्स प्रा. लि. यांचे दि.१.१२.२०२३, दि.२.३.२०२४, दि.१.६.२०२४,व दि.२.९.२०२४ आणि दि.२.१२.२०२४ रोजीची देयके.

२१. मे. प्राईस वॉटर हाऊस कूपर्स कंपनी यांचा दि.१२.८.२०२४ व १६.१.२०२५ रोजीचा अहवाल.

२२. अपर पोलीस महासंचालक (नि. व स.), पोलीस महासंचालक कार्यालय, मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं / १७ / ६१६२ / पो.ठाणे सीसीटीव्ही प्रकल्प / ७७ / २०२२, दि.१७.३.२०२५ रोजीचे पत्र.

२३. अपर पोलीस महासंचालक (नि. व स.), पोलीस महासंचालक कार्यालय, मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं / १७ / ६१६२ / डायल-११२ प्रकल्प/ ८१ / २०२७, दि.३.४.२०२५ रोजीचे पत्र.

२४. वित्त विभाग,शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०२५/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि.७.४.२०२५.

**प्रस्तावना :-**

मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार राज्यातील सर्व पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही बसविण्याबाबत उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या दि.१३.११.२०१९ रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार संदर्भ क्र.१२ येथील शासन निर्णयान्वये राज्यातील सर्व पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी येणाऱ्या रु.११० कोटी (सर्व कर व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळाच्या सेवाशुल्कासह) एवढ्या सुधारीत खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. तसेच संदर्भाधीन क्र.१३ येथे नमूद दिनांक ११.१२.२०१९ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील सर्व पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे काम हे महाराष्ट्र माहिती व तंत्रज्ञान महामंडळामार्फत न करता पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्यामार्फत करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

राज्यातील एकूण १०८९ पोलीस ठाण्यांपैकी में सुजाता कम्प्युटर्स प्रा. लि. यांनी ६ झोन मधील ७९२ पैकी ३९७ व मे. जावी सिस्टिम इंडिया प्रा. लि. यांनी ३ झोन मधील २९७ पैकी १५० असे एकूण ५४७ पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही बसविण्याचे काम पूर्ण केल्यामुळे शासन निर्णय, गृह विभाग दि.१७.०१.२०२२ अन्वये राज्यातील पोलीस ठाण्यांमध्ये मा. न्यायालयाच्या आदेशानुसार सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी प्रकल्पाचे पुरवठादार मे. सुजाता कम्प्युटर्स प्रा. लि. यांना अदा करावयाचे रु.१७,५६,०३,६८०/- (जीएसटी सह) व मे. जावी सिस्टिम इंडिया प्रा. लि. यांना अदा करावयाचे रु.५,८९,६२,२२६/- (जीएसटी सह) असा एकूण रु.२३,४५,६५,९०६/- इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. तसेच गृह विभागाच्या दि.१२.१२.२०२२ शासन निर्णयान्वये मे. सुजाता कम्प्युटर्स प्रा.लि. यांनी Phase-II मधील पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही बसविण्याचे उर्वरीत ५०% काम केल्यामुळे सदर प्रकल्पाच्या RFP मधील तरतूदीनुसार Revised CAPEX

Cost च्या १०% Mobilization Advance सह झोन क्र.६ (पुणे) साठी रु.२,१२,१५,६१५/- व झोन क्र.९ (नाशिक) साठी रु.४,०८,२०,९३६/- अशी जीएसटी सह एकूण रु.६,२०,३६,५५१/-इतका निधी वितरीत करण्यात आला आहे, आणि गृह विभागाच्या दि.२१.३.२०२३ शासन निर्णयान्वये अन्वये मे. सुजाता कम्प्युटर्स प्रा.लि. यांनी झोन क्र.८ (मुंबई) मधील पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही बसविण्याचे काम पूर्ण केल्यामुळे Phase-I Difference-४०% of CAPEX, Phase-II ४०% on CAPEX व Mobilization १०% of CAPEX यासाठी प्रकल्पाच्या RFP मधील तरतुदीनुसार रु.१०,६८,२११/- इतका दंडात्मक शुल्क वजा करुन जीएसटीसह एकूण रु.३,७२,६१,००८/- इतका निधी वितरीत केला आहे. तसेच गृह विभागाच्या दि.५.७.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये मे.सुजाता कम्प्युटर्स प्रा.लि. यांनी झोन क्र.२ (अमरावती) व झोन क्र. ५ (सोलापूर-कोल्हापूर) मधील पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही बसविण्याचे काम पुर्ण केल्यामुळे Phase-I Difference-४०% of CAPEX, Phase-II ४०% on CAPEX व Mobilization १०% of CAPEX यासाठी प्रकल्पाच्या RFP मधील तरतूदीनुसार अनुक्रमे रु.२८,०९,९५९/-(जीएसटीसह) व रु. २३,४९,८३३/- (जीएसटीसह) इतका दंडात्मक शुल्क वजा करुन अनुक्रमे रु.३,५६,६४,१५६/- व रु.२,९६,६६,८०१/- अशी एकूण जीएसटीसह रु.६,५३,३०,९५७/- इतका निधी वितरीत केला आहे. तसेच गृह विभागाच्या दि.११.१०.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये मे. सुजाता कम्प्युटर्स प्रा.लि.यांनी झोन क्र.१ (नागपूर) मधील पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही बसविण्याचे काम पूर्ण केल्यामुळे Phase-I Difference-४०% of CAPEX, Phase-II ४०% on CAPEX व Mobilization १०% of CAPEX यासाठी प्रकल्पाच्या RFP मधील तरतूदीनुसार रु.३३,७७,०३१/- (जीएसटीसह) इतका दंडात्मक शुल्क वजा करुन एकूण जीएसटीसह रु.३,७९,०२,७२४/- इतका निधी वितरीत केला आहे.

तद्नंतर गृह विभागाच्या दि.३१.३.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये मे. सुजाता कम्प्युटर्स प्रा.लि. यांनी सादर केलेल्या OPEX Phase Invoices for Quarter-१ (June २०२३-August २०२३) यासाठी एकूण रु.६०,३२,११९/- (अक्षरी रुपये साठ लाख बत्तीस हजार एकशे एकोणीस फक्त) (जीएसटीसह) इतका निधी वितरीत केला तसेच दि.३१.३.२०२४ रोजीच्या आणखी एका शासन निर्णयान्वये मे. सुजाता कम्प्युटर्स प्रा.लि. यांनी झोन क्र.१ (नागपूर), झोन क्र.२ (अमरावती), झोन क्र.५ (सोलापूर व कोल्हापूर), झोन क्र.८ (मुंबई) मधील पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही बसविण्याचे काम पूर्ण केल्यामुळे १०% Mobilization Advance, ४०% of CAPEX- Part- I Go live, ४०% CAPEX-Part २ Go Live यासाठी

प्रकल्पाच्या RFP मधील तरतूदीनुसार वरील विवरणपत्रात दर्शविल्यानुसार एकूण रु.६३,९८,९०४/- (रुपये त्रेसष्ट लाख अठ्ठ्याण्णव हजार नऊशे चार फक्त) (जीएसटीसह) इतका निधी वितरीत केला आहे.

मे. सुजाता कॉम्प्युटर्स प्रा.लि. यांचे झोन क्र. १ नागपूर, झोन क्र.२ अमरावती, झोन क्र. ५, सोलापूर व कोल्हापूर, झोन क्र. ६, पुणे, झोन क्र. ८, मुंबई आणि झोन क्र.९, नाशिक या विभागाकरिता OPEX Phase Invoices for Quarter २ ते Quarter ६ (September २०२३ to November २०२४) च्या कालावधीत केलेल्या कामाच्या देयकाची undisputed amount वर सद्यस्थितीत पुढील कार्यवाही करून मध्यवती प्रकल्प सल्लागार समितीच्या अहवालाप्रमाणे देयके अदा करण्यात याची असा निर्णय घेण्यात आला आहे. सदर निर्णयानुसार देयकांची undisputed amount चा मध्यवर्ती प्रकल्प सल्लागार समितीच्या अहवालाप्रमाणे व वरील नमुद केलेल्या प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या निर्णयानुसार प्रत्येक झोनप्रमाणे एकूण देयकाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

**(A) Payment Summary for zones (1,2,5,6,8,9) - Q2 to Q6:**

| **Payment Summary for zones (1,2,5,6,8,9) - Q2 to Q6** | | **Total Amount claimed by SI (in INR)** | **Payment value applicable to SI as per verification forms, payment milestones & system generated SLA report (in INR)** | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | Payment to be made for each Quarter of AMC Period | Penalty to be imposed on account of SLA breach as per RFP/Corrigendum | Total Amount to be paid after penalty imposition |
| one 1 | Total Amount (excl. GST) | 50,73,857.81 | 50,73,858 | 16,21,000 | 34,52,858 |
| | Total Amount (incl. GST) | 59,87,151.00 | 59,87,152 | 19,12,780 | 40,74,372 |
| one 2 | Total Amount (excl. GST) | 46,54,147.95 | 46,54,148 | 5,26,500 | 41,27,648 |
| | Total Amount (incl. GST) | 54,91,895.00 | 54,91,895 | 6,21,270 | 48,70,625 |
| one 5 | Total Amount (excl. GST) | 38,50,250.05 | 38,50,250 | 12,15,000 | 26,35,250 |
| | Total Amount (incl. GST) | 45,43,295.00 | 45,43,295 | 14,33,700 | 31,09,595 |
| one 6 | Total Amount (excl. GST) | 24,67,236.05 | 24,67,236 | 2,49,500 | 22,17,736 |
| | Total Amount (incl. GST) | 29,11,340.00 | 29,11,339 | 2,94,410 | 26,16,929 |
| one 8 | Total Amount (excl. GST) | 47,43,679.15 | 47,43,679 | 28,40,000 | 19,03,679 |
| | Total Amount (incl. GST) | 55,97,540.00 | 55,97,541 | 33,51,200 | 22,46,341 |
| one 9 | Total Amount (excl. GST) | 48,39,509.45 | 48,39,509 | 25,46,000 | 22,93,509 |
| | Total Amount (incl. GST) | 57,10,620.00 | 57,10,621 | 30,04,280 | 27,06,341 |
| **otal** | **Total Amount (excl. GST)** | 2,56,28,680.46 | 2,56,28,680 | 89,98,000 | 1,66,30,680 |
| | **Total Amount (incl. GST)** | 3,02,41,841.00 | 3,02,41,843 | 1,06,17,640 | 1,96,24,203 |

मे. सुजाता कॉम्प्युटर्स प्रा.लि. यांनी झोन क्र.१ नागपूर, झोन क्र.२ अमरावती, झोन क्र.५ सोलापूर व कोल्हापूर, आणि झोन क्र.८ मुंबई या विभागातील काही पोलीस ठाणे येथे पोलीस स्टेशन नुतनीकरण / दुरुस्ती / स्थलांतर इत्यादी कारणांमुळे प्रलंबित असलेल्या सीसीटीव्ही यंत्रणेची उभारणी पूर्ण केल्याच्या अनुषंगाने देयके सादर केली आहेत. प्रकल्प सल्लागार M/s. PWC द्वारे Payment Note सादर केली असून, पोलीस ठाणे CCTV प्रकल्पाकरिता स्थापन करण्यात आलेल्या मध्यवर्ती प्रकल्प सल्लागार समितीने सदरची देयके तपासून अहवाल सादर केला आहे.

OPEX Phase Invoices for Quarter २ ते Quarter ६ (September २०२३ to November २०२४) च्या कालावधीत केलेल्या कामाकरीता सादर केलेल्या देयकाची एकूण रक्कम रूपये १,९६,२४,२०३/- (जीएसटी सह) (अक्षरी रू.एक कोटी शहाण्णव लाख चोवीस हजार दोनशे तीन फक्त) (जीएसटीसह) ची देयके अदा करावयाची बाब शासनाच्या विचाराधीन होती. परंतु सुधारीत अंदाजाच्या मर्यादेत रुपये ८४,३६,१६०/- एवढी शिल्लक रक्कम वितरीत करण्याचा शासन निर्णय दि.३१.३.२०२५ रोजी निर्गमित केला होता. तथापि, पोलीस महासंचालक कार्यालयाकडून दि.३.४.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे बील पोर्टल तांत्रिक अडचणींमुळे लॉग इन होत नसल्याने सदरची देयके दि.३१.३.२०२५ रोजी विहीत वेळेत कोषागारात सादर करणे शक्य झाले नाही व त्यामुळे हा निधी २०२४-२५ मध्ये खर्च झाला नाही. यास्तव सदर निधी सन २०२५-२६ या वित्तीय वर्षात मंजूर करण्याची केलेली विनंती विचारात घेता त्यानुषंगाने शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**<u>शासन निर्णय</u> :-**

राज्यातील पोलीस ठाण्यांमध्ये मा. न्यायालयाच्या आदेशानुसार सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी प्रकल्पाचे पुरवठादार मे. सुजाता कम्प्युटर्स प्रा.लि. यांनी OPEX Phase Invoices for Quarter २ ते Quarter ६ (September २०२३ to November २०२४) च्या कालावधीत केलेल्या कामाकरीता सादर केलेल्या देयकाची एकूण रक्कम रूपये १,९६,२४,२०३/- (जीएसटी सह) (अक्षरी रू.एक कोटी शहाण्णव लाख चोवीस हजार दोनशे तीन फक्त) इतकी रक्कम देय आहे. परंतु उपलब्ध तरतूदीच्या मर्यादेत रु.८४,३६१६०/- (जीएसटीसह) (अक्षरी रुपये चौऱ्याऐंशी लाख छत्तीस हजार एकशे साठ फक्त) इतकी रक्कम वितरीत करण्याचा समक्रमांकाचा दि.३१.३.२०२५ रोजीचा शासन निर्णय याद्वारे अधिक्रमित करण्यात येत आहे. मे. सुजाता कम्प्युटर्स प्रा.लि. यांनी OPEX Phase Invoices for Quarter २ ते Quarter ६ (September २०२३ to November २०२४) च्या कालावधीत केलेल्या कामाकरीता सादर केलेल्या देयकाची एकूण रक्कम रूपये १,९६,२४,२०३/- (जीएसटी सह) (अक्षरी रू.एक कोटी शहाण्णव लाख चोवीस हजार दोनशे तीन फक्त) इतकी देय रक्कम अदा करण्यास याद्वारे शासन मंजूरी देण्यात येत आहे.

२. सदर रक्कमेची देयके अदा करतांना आयकर व अंमलात असलेले कर वजाती करुन अदा करण्यात यावे.

३. प्रस्तुत प्रकरणी उपरोक्त प्रमाणे होणारा खर्च हा "मागणी क्र.बी-१०, ४०५५ - पोलीस यावरील भांडवली खर्च, ८०० इतर खर्च, (००) (०९) सीसीटीव्ही संनियंत्रण यंत्रणा बसविणे (४०५५ ०२२३) या अंतर्गत ५२-यंत्रसामग्री व साधनसामग्री" या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो सन २०२५-२०२६ या वित्तीय वर्षासाठी उपलब्ध असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

४. सदर निधी कोषागारातून आहरित करण्यासाठी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना नियंत्रण अधिकारी व त्यांच्या अधिनस्त आहरण व संवितरण अधिकाऱ्याला आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषीत करण्यात आले आहे.

५. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.१८.४.२०१७ ला अनुसरुन प्रशासकीय विभागांना असलेल्या अधिकारान्वये, तसेच वित्त विभागाचा शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम,भाग-२,दि.१७.४.२०१५ मधील वित्तीय अधिकार, नियम पुस्तिका,१९७८ भाग-पहिला,उपविभाग-दोन,महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम,१९६५ अन्वये प्रशासकीय विभागाला प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारान्वये तसेच वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२५/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि.७.४.२०२५ अनुसार सन २०२५-२६ या वित्तीय वर्षाच्या अनिवार्य व कार्यक्रमांतर्गत खर्चाचा अर्थसंकल्पित निधी वितरणास वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.३४८/२०२५/व्यय-७ दि.८.५.२०२५ अन्वये दिलेल्या मान्यतेस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या **www.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२५०५१९१६०१०७१८२९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAJENDRA TANAJI BHALWANE

Digitally signed by RAJENDRA TANAJI BHALWANE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, 2.5.4.20=38d121bf4a170d16dacf98520f0ac44551976931d2758148ccaa24d1fb27b9df, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=BADFC0DAA40CC485400AAD9CEABCD514095659A6CDFAC856815518DCD188C23A, cn=RAJENDRA TANAJI BHALWANE
Date: 2025.05.19 16:01:47 +05'30'

**(रा.ता. भालवणे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव,राजभवन,मुंबई.
२. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
३. अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. प्रधान सचिव, माहिती तंत्रज्ञान, मंत्रालय, मुंबई.
८. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
९. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.

१०. महालेखालपाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.

११. अधिदान व लेखा अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

१२. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.

१३. मे. सुजाता कम्प्युटर्स प्रा. लि., ६६/२, गुरुछाया अपार्टमेन्ट, कर्वे रोड, नल स्टॉप, पुणे-४११००४.

१४. मे. प्राईसवॉटर हाऊस कूपर्स लि., २५२, वीर सावरकर मार्ग, दादर (पश्चिम), मुंबई-४०००२८.

१५. वित्त विभाग (व्यय-७/वित्तीय सुधारणा) मंत्रालय, मुंबई-३२.

१६. सहसचिव, (पोल-१४) गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

१७. निवडनस्ती, पोल-३. .....